# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/08/2023 (बुधवार) सायंकाळ


---

### मौदा पोलीसांनी अवैध गोवंश वाहतुक करणाऱ्या आयसर वाहन पकडून २५ गोवंश यांना दिले जिवनदान

दिनांक ०८/०८/२०२३ रोजी पोलिस स्टेशन मौदा येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, माथनी टोल नाका येथे कथ्थ्या रंगाचा आयसर सहा चक्का ट्रक क्र. एम. एच.– ३४/ए. व्ही.– १२०४ मध्ये अवैधरीत्या जनावरे कोंबुन नेत आहेत. अशा माहिती वरून टोलनाका माथनी येथे नाकाबंदी करीत असता कथ्थ्या रंगाचा आयसर सहा चक्का ट्रक क्र. एम. एच.– ३४/ए.व्ही.– १२०४ येतांनी दिसला असता थांबण्याचा इशारा केला गाडी थांबवली व वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनात **आरोपी नामे– १) मोहम्मद तौसीफ शेख, रा. अडयाळ ता. पवनी जि. भंडारा २) सोहेल सुभान पठान, रा. अडयाळ ता. पवनी जि. भंडारा ३) आतिक साबीर शेख रा. अडयाळ ता. पवनी जि. भंडारा** यास ताब्यात घेवून सदर आयसर सहा चक्का ट्रक गाडी तपासले असता वाहनात पांढरा लालसर भुरकट रंगाचे लहान मोठे एकुण २५ गोवंश जनावरे प्रत्येकी किंमती १५०००/–रू प्रमाणे ३,७५,०००/–रू चा गोवंश त्यांच्या शिंगाला पायाला तोंडाला दोरीने बांधुन निर्दयतेने कोंबुन कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता उपासमारीने व्याकुळ होतील अशा स्थितीत कत्तलीकरीता घेवुन जात असल्याने पांढरा लालसर भुरकट रंगाचे लहान मोठे एकुण २५ गोवंश जनावरे प्रत्येकी किंमती १५०००/–रू प्रमाणे ३,७५,०००/–रू. चा गोवंश जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातून आयसर सहा चक्का ट्रक क्र. एम. एच.– ३४/ए. व्ही.– १२०४ किंमती अंदाजे ६,००,०००/– रू असा एकुण ९,७५,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करून गोवंश यांना देखभालीकरीता गौरक्षण संस्था खैरी पिपळगाव ता. लाखनी येथे पोहचवण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– रोशन पाटील पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ११ (१) (ड) ५ ए, ९ प्राणी संरक्षण काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक भुते मॅडम मो. नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

# अपघातात मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत मौजा डोरली भिंगारे ता. काटोल येथे दिनांक ०८/०८/२०२३ चे १२.०० वा. १२.१० वा. सुमारास फिर्यादी नामे— दिलीप किसनाजी रोकडे, वय ४५ वर्ष, रा. डोरली भिंगारे याचे वडील **मृतक नामे— कृष्णाजी रोकडे, वय ७५ वर्ष, रा. डोरली भिंगारे** हे रोड क्रॉस करित असता काटोल कडुन कळमेश्वरकडे येणारी यामाहा एफ. झेड. एस. गाडी क्र. सी. जी.—०४/एन. जे. —६११० चा चालक आरोपी नामे —रूपम किशोर उमले रा. वरूड याने आपले ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकास धडक मारून त्याचे मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४(अ) भादंवी सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मिश्रा पोस्टे कळमेश्वर मो. नं. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर